महाराष्ट्र शासन
वनविभाग
उपवनसंरक्षक, मध्य चांदा वनविभाग, यांचे कार्यालय मुल रोड, चंद्रपूर
दुरध्वनी क्र 233508/250561-07172 .E-mail :-dycfcentralchanda@mahaforest.gov.in

क्रमांक- कक्ष/सर्व्हे/जमीन/2022-23/65 चंद्रपूर, दिनांक :-17/04/2023

प्रति,

मुख्य वनसंरक्षक
चंद्रपूर वनवृत्त, चंद्रपूर

विषय :- वन (संवर्धन) अधिनियम 1980 अंतर्गत मौजा चक फुटाणा ते चक नवेगाव रस्ता बांधकामाकरीता 2.3427 हे. आर. वनजमीन वळतीकरण करणे बाबतचा प्रस्ताव.

संदर्भ :- 1. शासन पत्र क्र. एफएलडी-3623/प्र.क्र.29/F-10, दिनांक 10.02.2023.
2. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी, म. रा. नागपुर यांचे कार्यालयाचे पत्र क्रमांक कक्ष-१७/नोडल/चंद्रपूर/आयडी-१४२०९/१७/२३-२४ दिनांक ०३/०४/२०२३.

संदर्भिय पत्राचे अनुषंगाने कळविण्यात येते की, संदर्भिय पत्र क्र. २ अन्वये विषयांकीत प्रस्तावामध्ये उपस्थित केलेल्या आक्षेपांची पुर्तता खालील प्रमाणे करण्यात येत आहे.

अ.क्र.	घेतलेले आक्षेप	पुर्तता अहवाल
1	सदर प्रस्तावास पर्यायी वनीकरण योजा लागू होत नाही बाबत सोबत जोडण्यात आलेल्या केंद्र शासनाचे दिनांक १३/०५/२०२३, दिनांक १६/०६/२०११, दिनांक १७/०५/२०१३ चा अभ्यास करण्यात आला आणि दिनांक २८/०३/२०१९ चे पत्रान्वये प्रसिध्द करण्यात करण्यात आलेल्या हँड बूक नुसार डाव्या विचारसरणी ने प्रभावित क्षेत्रातील (left Wing Extremist) तेरा (१३) प्रकल्पांची मुदत दिनांक ३१/१२/२०२० पर्यंतच मुदत होती. सदरची मुदत वाढविण्यात आलेली नाही. या बाबत केंद्र शासनाचे नागपुर स्थित कार्यालयाशी संपर्क करुन खात्री करण्यात आलेली आहे. त्यामुळे सदर प्रस्तावास पर्यायी वनीकरणाची योजना सादर करणे बंधनकारक आहे.	पार्ट – II मध्ये दुरुस्ती करण्यात आलेली असुन ऑन लाईन व ऑफ लाईन सुधारीत पार्ट – II सोबत सादर करण्यात येत आहे. तसेच पर्यायी वनीकरणाची योजना, नकाशा, KML फाईल (सिडी फॉर्म) मध्ये सोबत सादर करण्यात येत आहे.
2	पर्यायी वनीकरणाचे क्षेत्राची निवड करणे, प्रकल्प यंत्रणेचे पर्यायी वनीकरणा संबधी रक्कम भरण्यास तयार असल्ययाचे हमीपत्र घेणे, पर्यायी वनीकरण क्षंत्राची KML file संपुर्ण माहितीसह आणि पर्यायी वनीकरणाची १० वर्षाच्या योजनेसह परिपूर्ण प्रस्ताव या कार्यालयास तीन प्रतित सादर करावा.	१) पर्यायी वनीकरणाचे क्षेत्राची निवड खालील प्रमाणे करण्यात आलेली आहे. २) पर्यायी वनीकरणा संबधी रक्कम भरण्यास तयार असल्ययाचे प्रकल्प यंत्रणेचे हमीपत्र सोबत जोडलेले आहे. ३) पर्यायी वनीकरण क्षंत्राची KML file संपुर्ण माहितीसह आणि पर्यायी वनीकरणाची १० वर्षाच्या योजना सोबत जोडण्यात आलेली आहे.
3	तसेच सदर प्रस्ताव सादर करतांना जे वनक्षेत्र वळती करण्याचे प्रस्तावीत करण्यात येत आहे त्याचा तपशिलानुसार KML File ज्यामध्ये कम्पार्टमेंट बांऊड्री, गट /सर्व्हे बांडंड्री गावाचे नांव, रेंजए राऊंड, बिट, क्षेत्राची लांबी X रुंदी, क्षेत्रफळ चौ. मीटर आणि हेक्टर मध्ये या प्रमाणे सादर करावी.	प्रस्तावीत वनक्षेत्राचे KMLfile मध्ये पुर्तता करुन सिडी फॉर्म मध्ये KMLfile सोबत सादर करण्यात येत आहे.

परीक्षेत्र	उपक्षेत्र	नियतक्षेत्र	गाव	क.न.	क्षेत्र (हे.)
पोंभुर्णा	घोसरी	नवेगाव भुजला	नवेगाव भुजला	५८६	५.००

सहपत्र:- वरीलप्रमाणे

(श्वेता बोड्डु)
उपवनसंरक्षक,
मध्य चांदा वनविभाग, चंद्रपूर

प्रतिलीपी:- कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, चंद्रपूर यांना माहितीस व आवश्यक कार्यवाहीस अग्रेषित.